| MHKO110011592019 | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | प्रकरण दाखल दिनांक | : | २३-०७-२०१९ | | |
| | प्रकरण नोंदणी दिनांक | : | २३ -०७-२०१९ | | |
| | निकाल दिनांक | : | ०७-०७-२०२६ | | |
| | कालावधी | : | व. | म. | दि. |
| | | | ०६ | ११ | १४ |

**पेठ–वडगांव येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी जे.एन. भस्मे )**
**न्यायनिर्णय घोषीत दिनांक – ०७ जुलै, २०२६**

**(संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ८८६/२०१९)**
**(निशाणी क्र.        /ब )**

गुन्हा नोंद क्र. १६५/२०१९, हातकणंगले पोलीस ठाणे, जिल्हा – कोल्हापूर.

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी / तक्रारदार** | | **महाराष्ट्र शासन,**<br>मार्फत पोलीस निरीक्षक,<br>हातकणंगले पोलीस ठाणे, जिल्हा – कोल्हापूर. |
| अभियोग पक्षातर्फे | | सहाय्यक सरकारी अभियोक्ता<br>श्रीमती डी. पी. घोलप. |
| **आरोपी** | | **राहुल जोतिबा हेरले,**<br>वय वर्ष –२२, व्यवसाय – चालक,<br>रा.– अमृत नगर फाटा, भैरववाडी, ता. पन्हाळा. |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | | विधीज्ञ एस.बी. पाटील. |

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :– | २९/०३/२०१९ |
| फिर्याद दाखल दिनांक | :– | ०४/०४/२०१९ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :– | २३/०७/२०१९ |
| गुन्ह्याचे घटक निश्चित केल्याचा दिनांक | :– | ०५/१२/२०१९ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :– | ०७/११/२०२५ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :– | ––– |
| न्यायनिर्णय दिनांक | :– | ०७/०७/२०२६ |

| | | |
|---|---|---|
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात. | :- | --- |

## आरोपीची माहिती

| आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याची दिनांक | दोषारोप | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (Set Off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| **राहुल जोतिबा हेरले** | १५/०५/ २०१९ | १५/०५/ २०१९ | भा.दं.सं. कलम २७९, ३३७, ३३८ व मो.वा.का.कलम १८४, ३४(अ) (ब), १५(२) (९)/१७७ | निर्दोष मुक्तता | --- | --- |

**अभियोग पक्षातर्फे घेतलेले साक्षीदार :**

| अ.क्र. | साक्षीदाराचे नांव | निशाणी | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|---|
| **अ.सा.क्र.१.** | विनाकय बाळासाहेब पोर्ले | **५** | फिर्यादी |

**अभियोगपक्षातर्फे निशाणी दिलेले दस्तऐवज :**

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | अ.नि.क्र.१९/अ.सा.क्र.१. | फिर्याद वरील सहीस |

**बचाव पक्षातर्फे घेतलेल्या साक्षीदारांची यादी.**

| अ.क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| **१.** | निरंक | निरंक | निरंक |

**बचाव पक्षातर्फे दिलेले दस्तऐवज**

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**न्यायालयामार्फत तपासणेत आलेल्या साक्षीदारांची यादी.**

| अ.क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | निरंक | निरंक | निरंक |

**न्यायालयामार्फत दिलेले निशाणी**

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | ७ | दोषारोप |

**भौतिक वस्तु**

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

:- **न्यायनिर्णय** -:-

**(घोषित दि. ०७ जुलै, २०२६)**

प्रस्तुत खटला आरोपीविरुद्ध भारतीय दंड विधान संहिता कलम २७९, ३३७, ३३८ व मोटार वाहन कायदा कलम १८४, १३४(अ)(ब), १५(२)(९)/१७७ या अपराधाकरीता संपरिक्षा घेण्यात येते.

**अभियोगपक्षाची थोडक्यात हकिकत खालील प्रमाणे –**

**०२.** दि.२९/०३/२०१९ रोजी सकाळी १८.०० वाजणेचे सुमारास हातकणंगले ते वाठार जाणारे रोडवर, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथील बाबासाहेब ठोंबरे यांच्या शेतासमोर आरोपीने त्याच्या ताब्यातील चारचाकी वाहन क्र. एमएच-०६ ए डब्ल्यू ५०८० ही विरुद्ध दिशेने येऊन, हयगयीने, अविचाराने व निष्काळजीपणाने रोडवर घेतलेने वडगाव दिशने जाणारी फिर्यादी यांच्या मोटारसायकल क्र. एमएच-०९ एजे ६९३८ ला धडक देऊन फिर्यादी व त्यांच्या मागे बसलेले सुभाष चौगले यांना किरकोळ व गंभीर जखमी केले. सबब, फिर्यादी यांनी पोलीस ठाणे येथे आरोपीविरुद्ध फिर्याद दिली.

०३. फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरुन हातकणंगले पोलीस ठाणेच्या पोलिसांनी गुन्हा नोंद क्र.१६५/२०१९ भारतीय दंड विधान संहिता कलम २७९, ३३७, ३३८ व मोटार वाहन कायदा कलम १८४, १३४(अ)(ब), १५(२)(९)/१७७ अन्वये गुन्हा नोंदविला.

०४. तपासीअंमलदार श्री. एस. एन चव्हाण यांनी तपास केला, घटनास्थळ पंचनामा तयार केला, साक्षीदारांचे जाबजवाब नोंदविले व तपास पूर्ण झाल्यानंतर आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता, कलम २७९, ३३७, ३३८ व मोटार वाहन कायदा कलम १८४, १३४(अ)(ब), १५(२) (९)/१७७ अन्वये शिक्षापात्र गुन्हयाबाबत दोषारोप पत्र न्यायालयात दाखल केले.

०५. माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपीवर नि.क्र. ७ प्रमाणे दोषारोप निश्चित केले. आरोपीने गुन्हा नाकबुल करुन संपरिक्षेची मागणी केल्या वरुन त्याच्या विरुध्द खटला चालविण्यात आला. अभियोगपक्षाच्या एकंदरीत पुराव्यातून गुन्हादर्शक परिस्थिती निष्पन्न न झाल्याने आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३१३ अन्वयेचे निवेदन नोंदविण्यात आले नाही.

०६. सदर कामी सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपीचे वकील यांचा युक्तिवाद ऐकला. एकंदरीत खालील विचारार्थ बाबी माझे समोर निर्माण होतात त्यावरील माझे निष्कर्ष प्रस्तुत कारणमिमांसेच्या आधारे मी पुढील प्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, दि. २९/०३/२०१९ रोजी १८.०० वाजणेचे सुमारास नरंदे, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथील बाबासाहेब ठोंबरे यांचे शेताच्या समोरील रस्त्यावर आरोपीने त्याच्या ताब्यातील हुंद्याई कंपनीची चारचाकी क्र. एमएच-०६ एडब्ल्यू ५०८० जोरात वेगाने निष्काळजीपणाने, बेदरकारपणे व हयगय करुन अविचाराने, रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन चालवला व त्या अन्वये आरोपीने भारतीय दंड संहिता कलम २७९ अन्वये गुन्हा केला ? | ..नाही |

| | | |
|---|---|---|
| २. | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, उपरोक्त दिनांक, वेळ व ठिकाणी, आरोपीने मानवी जीवितास अथवा इतरांच्या वैयक्तीक सुरक्षेतता धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे व हयगयीने नमुद वाहन चालवुन अपघात करुन मोटारसायकल क्र. एमएच-०९ एजे ६९३८ ला जोरात धडक देऊन विनायक बाळासाहेब पोर्ले व सुभाष महादेव चौगले यांना गंभीररित्या जखमी करणेस कारणीभुत झाला व त्या अन्वये आरोपीने भारतीय दंड संहिता कलम ३३७ अन्वये गुन्हा केला ? | **..नाही** |
| ३. | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, उपरोक्त दिनांक, वेळ व ठिकाणी, आरोपीने मानवी जीवितास अथवा इतरांच्या वैयक्तीक सुरक्षेतता धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे व हयगयीने, वर नमुद वाहन चालवून अपघात करुन विनायक बाळासाहेब पोर्ले व सुभाष महादेव चौगले यांच्या मोटारसायकलला जोरात धडक देऊन त्यांना जखमी करणेस कारणीभुत झाला व त्या अन्वये आरोपीने भारतीय दंड संहिता कलम ३३८ अन्वये गुन्हा केला ? | **..नाही** |
| ४. | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, उपरोक्त दिनांक, वेळ व ठिकाणी, आरोपीने संबंधीत रस्त्याचे परिस्थितीचा व ट्रॅफीकचा विचार न करता लोकांना धोकादायक ठरेल अशा वेगाने अथवा अशा पध्दतीने वर नमुद वाहन चालवून तुमची चालक या नात्याने असलेली कायदेशीर जबाबदारी न पार पाडता घटनास्थळावरुन पळून गेला व त्या अन्वये आरोपीने मोटर वाहन कायदा कलम १८४, १३४(अ)(ब), १५(२)(९)/१७७ अन्वये गुन्हा केला ? | **..नाही** |
| ५. | काय आदेश? | **आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते.** |

<u>**कारणमिमांसा**</u>

<u>**वादप्रश्न क्र.१ ते ४ करीता :-**</u>

०७. सदरच्या वादप्रश्नांचे निष्कर्ष एकमेकांवर अवलंबुन असल्यामुळे, विवेचनाची पुनरावृत्ती टाळण्यासाठी सदर वादप्रश्नांचे विवेचन एकत्रीतरित्या करण्यांत येत आहे. प्रकरणात समोर आलेल्या अभियोग पक्षाचा पुरावा पाहता, विचारार्थ वादप्रश्न क्र.१ ते ४ स्वतंत्रपणे चर्चेस घेण्याची मुळीच आवश्यकता नाही. त्यामुळे मी ते एकत्रीतपणे विचारात घेत आहे. संचिकेतील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले.

०८. आरोपीवरील वर नमुद गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने साक्षीदार क्र.१ विनायक बाळासोबत पोर्ले (जखमी) यांना निशाणी क्र. १८ कडे तपासले असुन त्यांनी त्यांचे साक्षीपुराव्यामध्ये असे कथन केले आहे की, दि. २०/०३/२०१९ रोजी ते गाडीवरुन पडले. साक्षीदार पुढे कथन करतात की, असे काही घडले नव्हतेदि. १९/०३/२०१९ रोजी ते कामावरुन घरी येत असताना आरोपी यांच्या चारचाकी गाडी क्र. एमएच-०६ एडब्ल्यू ५०८० ने त्यांच्या गाडीला जोराची धडक दिली. सदर साक्षीदार यांनी फिर्यादमधील मजकूर त्यांना माहिती नाही असे कथन केले. सदर साक्षीदार यांनी अभियोग पक्षास अनुकुल अशी साक्ष दिलेली नाही, म्हणुन अभियोगपक्षाने सदर साक्षीदार यांना उलटतपासात ग्राहय असणारे सुचक प्रश्न विचारले असता त्यातुनही अभियोगपक्षास अनुकुल ठरेल असे काहीही निष्पन्न झाले नाही. सदर साक्षीदार हे जखमी असुन देखील त्यांनी आरोपीच्या बाजुने साक्ष दिलेली असल्यामुळे आरोपीविरुध्द कोणताच पुरावा आलेला नाही.

०९. आरोपी व फिर्यादी यांच्यामध्ये कोर्टाबाहेर तडजोड झाल्यामुळे इतर साक्षीदार तपासुन देखील आरोपीविरुध्द पुरावा येईल याबाबत शंका असल्यामुळे नि. ०१ वर आदेश पारित करुन सरकार पक्षाचा पुरावा बंद करणेत आला.

१०. जखमी साक्षीदार यांच्या माध्यमातून अभिलेखावर आणलेला पुरावा हा आरोपीने त्याचे ताब्यातील वाहन हे हयगयीने, बेदरकारपणे, घटनास्थळावरील परिस्थितीचा विचार न करता चालवुन मोटर वाहन कायद्यामधील तरतुदींचा भंग केल्याचे सिध्द होण्यास पुरेसा नाही. आरोपीने गुन्हा केला असल्याबाबत भक्कम व सबळ पुरावा देण्याची जबाबदारी अभियोग पक्षावर आहे. उपलब्ध पुरावा आरोपीने गुन्हा केला आहे असे मानण्यास पुरेसा नाही व त्याचा फायदा निश्चितच आरोपीच्या पक्षात जातो. त्यामुळे मी वादप्रश्न क्र.१ ते ४ नकारार्थी नोंदवत आहे.

**<u>वादप्रश्न क्र. ५ करीता :-</u>**

११. उपरोक्त विवेचनावरुन व निष्कर्षावरुन आरोपीने भारतीय दंड संहिता कलम २७९, ३३७, ३३८ सह मोटर वाहन कायदा कलम १८४, १३४(अ)(ब), १५(२)(९)/१७७ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने संशयापलीकडे सिध्द न केल्यामुळे आरोपीस मी निर्दोष मुक्त ठरवत आहे. यास्तव मी वादप्रश्न क्र. ५ करीता पुढील आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. आरोपी राहुल जोतीबा हेरले यांना भारतीय दंड संहिता कलम २७९, ३३७, ३३८ सह मोटर वाहन कायदा कलम १८४, १३४(अ)(ब), १५(२)(९)/१७७ अन्वयेच्या शिक्षापात्र गुन्हयातून फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५५(१) नुसार निर्दोष सोडण्यात येते.

२. आरोपीचा जामीन कदबा रद्द करण्यात येत आहेत.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७ (अ) प्रमाणे वरिष्ठ न्यायालयात हजर होण्याकरीता रक्कम रु.१५,०००/-(अक्षरी रुपये पंधरा हजार फक्त) चे वैयक्तिक बंधपत्र व जामिन द्यावे, ते पुढील सहा महिन्यापर्यंत वैध राहील.

(न्यायनिर्णय खूल्या न्यायालयात जाहिर करण्यात आला.)

JYOTI NITIN BHASME

Digitally signed by JYOTI NITIN BHASME
Date: 2026.07.07 17:48:28 +0530

**दिनांक- ०७/०७/२०२६** **(जे. एन. भस्मे)**
**पेठवडगाव** **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, पेठवडगाव, जि. कोल्हापूर**